सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
# ग्लोबल महातेज
https://epaper.globalmahatej.com/
वर्ष १ ले | अंक : १७६ | गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



**श्री. योगेश पाटील**
माजी नगरसेवक



**श्री. चंद्रकांत कंखरे**
चित्रकला शिक्षक



**श्री. अमित ललवाणी**
अमळनेर

**मांगल्यदायी गुढीपाडवा...**
(पान ४...)











अमळनेर : भूमी सुपोषण संवर्धन राष्ट्रीय अभियान शुभारंभाची श्री मंगळग्रह मंदिर परिसरात करण्यात आलेली जय्यत तयारी व कार्यक्रमस्थळाची पाहणी, बैठकीवेळी उपस्थित अक्षय कृषी परिवार, मंगळग्रह सेवा संस्थेचे पदाधिकारी व जिल्हाधिकारी रोहन घुगे व विविध विभागांचे प्रशासकीय अधिकारी आणि मान्यवर.
(सर्व छायाचित्रे : नीतेश बारी)

# भूमी सुपोषण संवर्धन अभियान शुभारंभाची तयारी पूर्णत्वास

## केंद्रीय कृषिमंत्री ना. शिवराजसिंह चौहान आज अमळनेरला येणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत भूमी सुपोषण संवर्धन या राष्ट्रीय अभियानाचा शुभारंभ गुरुवार, दि. १९ मार्च रोजी श्री मंगळग्रह मंदिर येथून होणार आहे. दुपारी २ वाजता आयोजीत या कार्यक्रमाला केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासह अनेक महानुभाव तसेच विविध सामाजिक, धार्मिक संस्थांसह सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित



राहणार आहेत. यासाठीची तयारी श्री मंगळग्रह मंदिर परिसरात पूर्णत्वास आली आहे.

जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या उपस्थितीत बुधवार, दि. १८ मार्च रोजी सकाळी विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यात भूमी सुपोषण संवर्धन या राष्ट्रीय अभियानाच्या शुभारंभ सोहळ्याच्या तयारी संदर्भात सविस्तर चर्चा करून सर्व विभागांच्या प्रमुखांकडून आढावा घेण्यात आला. याप्रसंगी जिल्हाधिकारी घुगे यांनी सदर अभियान हे कृषी क्षेत्र अर्थात शेतकऱ्यांच्या संदर्भात असल्याने या कार्यक्रमास त्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने लाभण्यासाठी आपण सर्वांनी आपापल्या पातळीवर प्रयत्न करावा. अमळनेरमधील खानदेश शिक्षण मंडळ, लायन्स व रोटरी क्लबचे पदाधिकारी, राजकीय क्षेत्रातील विविध पदाधिकारी, विविध संघटनांचे पदाधिकारी याठिकाणी उपस्थित आहेत त्यांनीही अभियानात सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. याप्रसंगी अमळनेरचे प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, चाळीसगावच्या अप्पर पोलीस अधीक्षक कविताताई नेरकर-पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, भाजप महाराष्ट्र प्रदेश चिटणीस भैरवीताई वाघ- पलांडे, खानदेश शिक्षण मंडळाचे संचालक योगेश मुंदडे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष लालचंद सैनानी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष मुख्तार खाटीक, नगरसेवक सचिन पाटील,
(पान २ वर)

### श्री मंगळग्रह मंदिरात विशेष भोमयागाचे आयोजन

गुरुवार, दि. १९ मार्च रोजी सकाळी ९. १५ ते दुपारी १२ या वेळेत श्री भूमी माता जन्मोत्सवानिमित्त विशेष भोमयागाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध मानकऱ्यांच्या उपस्थितीत मंत्रोच्चाराच्या माध्यमातून पूजाविधी होईल.

### ५१ फुटी गुढी उभारणार

मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री मंगळग्रह मंदिरात सकाळी ९ वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत विधिवतरित्या ५१ फुटी गुढी उभारण्यात येणार आहे. यावेळी उपस्थित सर्व मान्यवर गुढीचे विधिवत पूजन करतील.




## संपादकीय

# 'नेमेचि उडतो निवडणूक धुरळा'

'नेमेचि येतो पावसाळा', या म्हणीप्रमाणे जणू 'नेमेचि उडतो निवडणूक धुरळा' बारा महिन्यातून सहा महिने कुठे ना कुठे निवडणुका सुरू असतात. जगातील सर्वांत मोठा लोकशाहीवादी देश आणि त्या लोकशाहीवादी देशात जगातला सर्वाधिक काळ हा निवडणुकांमध्ये खर्च होतो हेही तितकेच खरे आहे. आता जाहीर झालेल्या आसाम, पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ या राज्यांच्या आणि पुद्दुचेरी केंद्रशासित प्रदेशाच्या निवडणुकांची रणधुमाळी ही लोकशाही प्रक्रियेचा एक भाग जरी असली तरी त्यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि होणारा प्रचंड खर्च लक्षात घेतल्यास यातून एकूण देशाच्या तिजोरीवर पडणारा भार प्रचंड स्वरूपाचा असतो, हे नाकारता येणार नाही. ज्याला आपण लोकशाही व्यवस्थेची आवश्यक प्रक्रिया समजतो. मात्र राजकीय पक्ष ज्या पद्धतीने निवडणुका लढवतात किंवा त्यांचा एकमेकांविरुद्ध ज्या पद्धतीने प्रचार सुरू असतो. तो पाहिला तर प्रत्यक्ष लोकशाही प्रक्रियेपेक्षा राजकीय स्वार्थाचाच धिंगाणा अधिक प्रमाणात पाहायला मिळतो. गेल्या दहा वर्षांपासून ज्या–ज्या काही निवडणुका झाल्या त्यात काही महत्त्वाचे बदल नोंदविले जात आहेत. मतदारांना आकर्षित करण्याकरिता ज्या पद्धतीची आमिषे दाखविली जातात ती पाहिल्यानंतर निवडणुका म्हणजे लोकशाहीच्या नावाने मतांच्या खरेदी–विक्रीचा बाजार म्हणण्याची वेळ येऊ लागली आहे. मतदाराला कोणत्याही प्रकारचे प्रलोभन दाखविणे किंवा तो कोणत्याही कारणाने प्रभावित होईल अशा प्रकारची कृत्ये ही बेकायदेशीर मानली गेली होती. अगदी टी. एन. शेषन यांच्या काळात भिंती रंगविण्याचे प्रकार बंद झाले. राजकारण्यांनी उद्‌घाटन केलेल्या फलकांवरही त्यांनी संक्रांत आणली होती. आचारसंहितेचा बडगा उगारून राजकीय पक्ष आणि उमेदवारांच्या खर्चावरही नियंत्रण आणले होते. म्हणजे एकीकडे मतदार राजकीय पक्षांच्या सापळ्यात सापडणार नाही यासाठी प्रयत्न केले गेले असताना आता मात्र अगदी उघडपणे मतदारांना आकर्षित करणारी आश्वासने केवळ दिली जातात असे नव्हे, तर प्रत्यक्ष अमलातही आणली जात आहेत. विशेषतः निवडणुका जाहीर होण्यापूर्वी या योजनांच्या घोषणा होत असतात.

एकेकाळी निवडणूक म्हटल्यानंतर त्याच्यावर पुरुषी वर्चस्व असायचे. मग अगदी सर्वाधिक पुरुष उमेदवार निवडणूक लढवत असत आणि मतदानालाही पुरुष मतदारांची संख्या सर्वाधिक राहत असे. गेल्या काही वर्षांत निवडणुकांमध्ये महिलांसाठी आरक्षण दिले जाऊ लागले. महिलाही मोठ्या प्रमाणावर निवडून येऊ लागल्या. परंतु गेल्या दहा वर्षांतील सर्वांत मोठा बदल असा आहे, की अनेक राज्यांमध्ये मतदानाच्या टक्केवारीत महिला मतदारांची संख्या सर्वाधिक असल्याचे पाहायला मिळाले आहे. ते प्रत्येक निवडणुकीत वाढते आहे. महिलांचा हा मतदान करण्याचा उत्साह एकाएकी किंवा अचानकपणे वाढलेला नाही. सातत्याने महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी भरमसाठ योजना घोषित केल्या गेल्या आहेत. दर विधानसभा निवडणुकीपूर्वी महिलांसाठीच्या या योजनांमध्ये सतत भर पडत आली. या योजनांचे थेट लाभ महिलांना मिळत असल्याने आणि त्या योजना चालू राहाव्यात, त्याचे फायदे मिळत राहावेत, या अपेक्षेपोटी महिला मतदार सर्वाधिक संख्येने मतदानाला येत आहेत. ज्यामध्ये रोख रक्कम थेट महिलांच्या खात्यात जमा करण्यापासून ते मोफत प्रवास, महिलांना मोफत शिक्षण यासारख्या एक ना अनेक योजना ठिकठिकाणी राबवल्या जातात. आतादेखील ज्या पाच राज्यांमध्येसुद्धा जिथे निवडणुका होणार आहेत तिथे अशाच महिलाविषयक योजना अंमलात आणल्या जातात. पश्चिम बंगालमधून लाडकी बहीण योजनेप्रमाणेच लोखिर भांडार योजना शिवाय मुलींच्या शिक्षणासाठी 'कन्याश्री' योजना, मुलींच्या विवाहासाठी 'रूपश्री' योजना अशा योजना आसाममध्येही सुरू आहेत. तामिळनाडूमध्ये महिलांना विवाहासाठी दिली जाणारी मदत शिवाय मोफत प्रवास, केरळमध्ये 'कुटुंबश्री' योजना शिवाय मोफत आरोग्य आणि महिलांसाठीची पेन्शन योजनाही राबवली जाते. मध्य प्रदेशात यापूर्वीच लाडकी बहीण योजना आहे. दिल्लीतही महिलांसाठीचा मोफत प्रवास राबवला जातो. महाराष्ट्रात मध्य प्रदेशच्याच योजनेची अंमलबजावणी करून लाडकी बहीण योजना राबवली जाते. त्या कारणांमुळेच भारताच्या निवडणूक प्रक्रियेत महिला मतदारांचा वाढत असलेला टक्का एक मोठा बदल ठरतो.

लोकशाही व्यवस्थेचा विचार केला तर ज्या ठिकाणी निष्पक्ष दबावविरहित आणि कोणत्याही प्रलोभनाशिवाय मतदान होणे अभिप्रेत आहे त्या मतदानाची जागा आता वेगवेगळ्या प्रलोभन योजनांनी घेतलेली आहे. विशेष म्हणजे मतदारांचादेखील या सगळ्याच निवडणूक प्रक्रियेकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगाने बदलतो आहे. कारण राजकीय लोक सत्ता आणि अधिकारांचा गडगंज वापर करतात. म्हणजे आमच्या मतावर ते निवडून येतात आणि भरमसाठ पैसा कमावतात. अशी एक राजकारण्यांविषयीची ठाम समजूत लोकांमध्ये निर्माण झालेली आहे. अशा परिस्थितीत जर सरकारी योजनांमधून आपलाही फायदा होत असेल तर तो करून घ्यावा. आणि म्हणूनच जे सरकार अशा योजना जाहीर करेल, त्यांच्या बाजूने मतदान करण्याचीही एक विचित्र मानसिकता विकसित होते आहे, ही गोष्ट कितपत योग्य आहे किंवा त्यातून लोकशाही व्यवस्था भक्कम होण्याऐवजी आणखीनच खिळखिळी होण्याचा धोका आहे. निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव आहे असे

म्हणून लोकांमधला उत्साह वाढवण्याचा प्रयत्न होतो. परंतु ज्या पद्धतीचा प्रचार, ज्या पद्धतीचे जाहीरनामे, आश्वासनं किंवा आमिषं दाखवली जातात, त्यावरून तो लोकशाहीचा उत्सव नसून यात्रा म्हणावी लागते. केवळ देशहित आणि त्यासाठी आवश्यक असलेली लोकशाही व्यवस्था संवर्धित करण्याच्या प्रामाणिक हेतूने ज्यावेळी मतदान होईल, त्याचवेळेला खऱ्या अर्थाने मतदानाचे कर्तव्य बजावल्याचे समाधान मिळू शकेल. आज राजकीय पक्षांमध्ये सत्ता प्राप्तीकरता मतदारांना आकर्षित करण्याचीच चढाओढ दिसून येते.

# खासदार स्मिताताई वाघांकडून रेल्वे प्रश्नांची संसदेत मांडणी

## दुसऱ्याच दिवशी मंत्र्यांची भेट घेऊन केला पाठपुरावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी खासदार स्मिताताई वाघ यांनी लोकसभेत रेल्वे मंत्रालयाच्या २०२६- २७ च्या अनुदान मागण्यांवरील चर्चेत सहभाग घेतला. जळगावच्या रेल्वे प्रश्नांवर त्यांनी प्रभावी मांडणी करून केंद्र सरकारचे लक्ष वेधले. दुसऱ्याच दिवशी त्यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन पाठपुरावाही केला आहे.

भाषणाच्या प्रारंभी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रेल्वे क्षेत्रात झालेल्या आमूलाग्र बदलांचे आभार मानले. २०१४ नंतर रेल्वे अधिक आधुनिक, सुरक्षित आणि गतिमान झाली असून महाराष्ट्राला रेल्वे



प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात निधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. २००९-१४ च्या तुलनेत २०२६-२७ मध्ये राज्यासाठी निधीत लक्षणीय वाढ झाली आहे. १०० टक्के विद्युतीकरण, हजारो किलोमीटर नवीन रेल्वे मार्ग आणि 'अमृत भारत स्टेशन' योजनेअंतर्गत १३२ स्थानकांचा विकास ही उल्लेखनीय कामगिरी असल्याचे त्यांनी सांगितले. जळगाव मतदारसंघासाठी महत्त्वाचा असलेला उधना- जलगाव रेल्वे कॉरिडॉर (७ हजार १०० कोटी रुपये) सध्या ८० टक्के पूर्णत्वाकडे गेला असून जुलै २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असल्याची माहिती त्यांनी दिली. या प्रकल्पामुळे मुंबई- भुसावळ- जळगाव मार्गावरील ताण कमी होऊन प्रवास अधिक जलद आणि सुलभ होणार आहे. तसेच या मार्गावर 'कवच' सुरक्षा प्रणाली लागू होत असल्यामुळे रेल्वे सुरक्षेत मोठी भर पडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी लोकसभा क्षेत्रातील रेल्वे वेळापत्रकातील बदलांमुळे प्रवाशांना होत असलेल्या अडचणींचा मुद्दा मांडला. सूरत- भुसावळ एक्सप्रेस (१९००५) आणि देवलाली- भुसावळ एक्सप्रेस (११११३) या गाड्यांच्या वेळेत झालेल्या बदलांमुळे विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी आणि शेतकरी वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. या गाड्यांचे वेळापत्रक तात्काळ पूर्ववत करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच उधना-पुणे दरम्यान थेट रेल्वे सेवा सुरू करण्याची गरज अधोरेखित करत त्यांनी हजारो प्रवासी सध्या बस किंवा खासगी वाहनांचा पर्याय वापरत असल्याचे सांगितले. जळगाव स्थानकावर महत्त्वाच्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली. कृषीप्रधान जळगाव जिल्ह्याच्या दृष्टीने रेल्वे लॉजिस्टिक्सचे महत्त्व स्पष्ट करत त्यांनी केळी, कापूस यांसारख्या उत्पादनांसाठी कोल्ड स्टोरेज, पार्सल व वेअरहाऊस सुविधा उभारण्याची गरज व्यक्त केली. जेणेकरून शेतकऱ्यांना मुंबई, दिल्ली आणि गुजरातच्या बाजारपेठांशी थेट जोडता येईल.

**मंत्र्यांची भेट; सकारात्मक प्रतिसाद**

लोकसभेतील चर्चेनंतर खासदार स्मिताताई वाघ यांनी मंगळवार, दि. १७ मार्च रोजी नवी दिल्ली येथे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीत उधना- पुणे एक्सप्रेस सुरू करणे हा प्रामुख्याने मुद्दा घेतला. तसेच उधना- भुसावळ व देवलाली- भुसावळ पॅसेंजर गाड्यांचे वेळापत्रक पूर्ववत करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. पाचोरा येथे विदर्भ एक्सप्रेस आणि चाळीसगाव येथे कर्नाटक एक्सप्रेस ला थांबा देण्याची मागणी केली केली. जळगाव, चाळीसगाव, पाचोरा, अमळनेर आणि धरणगाव परिसरातील प्रवासी, विद्यार्थी, कर्मचारी व शेतकरी वर्गाला होत असलेल्या अडचणींची त्यांनी सविस्तर मांडणी केली. रेल्वेमंत्र्यांनी या सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा केली. याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असे आश्वासनही दिले.

# राष्ट्रीय लोकअदालतीत १५२ खटल्यांचा निपटारा

## तीन कोटी १४ लाख ४१ हजारांची वसूली

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुका विधी सेवा समितीतर्फे बुधवार, दि. १८ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालत घेण्यात आली. यात ३ हजार ७३९ प्रलंबित खटल्यांपैकी १५२ खटल्यांचा निपटारा झाला आहे. एकूण ३ कोटी १४ लाख ४१ हजार २०३ रुपये वसुली झाली आहे.

न्यायालयातील प्रलंबित खटल्यानंतरच्या ५ हजार ४८९ पैकी १ हजार ४५३ खटले लोकन्यायालयात ठेवण्यात आले. त्यापैकी ११६ खटले निकाली निघाले. २ कोटी ८२ लाख २५ हजार १९२ रुपये वसूल झाले. तर खटलापूर्व प्रकरणांमध्ये २ हजार ३१६ खटले लोकन्यायालयात ठेवण्यात आले. त्यापैकी ३६ खटले निकाली निकाली काढण्यात आले. त्यात ३२ लाख १६ हजार ११ रुपये वसूल करण्यात आले. जिल्हा न्यायाधीश सी. व्ही. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश के. ई. चौगुले, सह दिवाणी न्यायाधीश एन. आर. यलमाणे यांच्या अध्यक्षतेखानी तीन पॅनल होते. पंच म्हणून ॲड. अमृता देसले, ॲड. व्ही. वाय. विंचूरकर, रमेश देशपांडे यांनी काम पाहिले. वकील संघाचे अध्यक्ष ॲड. गोपाल सोनवणे, उपाध्यक्ष ॲड. राकेश बिऱ्हाडे, सचिव ॲड. उदय शिसोदे, अधीक्षक सी. डब्ल्यू. बिऱ्हाडे, वरिष्ठ सहायक बी. एस. पांडव, कनिष्ठ सहायक ए. एस. कोठावदे, एन. ए. पाटील, एम. एच. साळुंखे, पी. टी. पाटील, सरकारी वकील ॲड. किशोर बागूल, राजेंद्र चौधरी यांनी सहकार्य केले. ▲

# कृषिमित्र गाय बगळा

पक्ष्यांची ओळख

**नाव :** गाय बगळा Cattle Egret
**रंग :** पांढऱ्या रंगाचा,पाठीवर पिवळी पिसे असतात,पाय काळे
**चोच :** पिवळ्या रंगाची
**डोळे :** पिवळ्या रंगाचे व तीक्ष्ण
**घरटे :** नदीच्या काठी,ओलसर जागी,दलदलीच्या जवळ झाडावर काड्यांचा उपयोग करून घरटे बांधतो
**अंडी :** मादी एप्रील मे मध्ये तीन चार अंडी देते.अंड्यांचा रंग पांढरा असून त्यावर निळसर छटा असते.
**आवाज :** बगळ्याचा आवाज घोगरा कर्कश असतो. इतर वेळेला बगळे शांत असतात.पण मादीला अभिवादन करतांना आवाज करतात.
**इतर वैशिष्ट्ये :** जनावरांच्या मागे फिरतात.त्यामुळे उडणारे किटकांवर बगळे ताव मारतात. शेत नांगरतांना बगळे हमखास दिसतात.अन्नासाठी बगळे स्थलांतर करतात.शेतातील किटक खात असल्यामुळे बगळे हे कृषीमित्र होत.



**संग्राहक : प्रा प्रकाश धर्माधिकारी**
**निसर्ग मित्र मंडळ,अमळनेर**

# हिंदू नववर्षानिमित्त आज शोभायात्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : हिंदू नववर्ष स्वागत समितीतर्फे यंदाही गुढीपाडव्यानिमित्त गुरुवार, दि. १९ मार्च रोजी सकाळी ८ वाजता हिंदू नववर्ष स्वागत शोभायात्रा निघणार आहे. या शोभायात्रेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वागत समितीतर्फे करण्यात आले आहे.

राष्ट्रप्रेमी, धार्मिक, सामाजिक संस्थांच्या व मंडळांच्या सहकार्याने ही शोभायात्रा निघणार आहे. नागरिकांनी सकाळी आपले प्रांगण झाडून, सडा शिंपडून रांगोळ्या काढाव्यात. घरावर भव्य गुढी उभारावी, पुष्पवृष्टी करून किंवा शक्य होईल त्या पध्दतीने शोभायात्रेचे स्वागत करावे. शिवाय मंगलवेश परिधान करून सहकुटूंब व मित्रमंडळींसह या यात्रेत सहभागी होऊन शोभा यात्रेचा आनंद घ्यावा. भारतीय पध्दतीने नववर्षाचे स्वागत करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


**असा आहे शोभायात्रेचा मार्ग**

सकाळी ८ वाजता बन्सीलाल पॅलेस येथून निघेल. तेथून प्रताप मिल स्टेशन रोड, स्वामी नारायण चौक, सुभाष चौक, राणी लक्ष्मीबाई चौक, दगडी दरवाजा, सराफ बाजार, वाडी चौक, माळी वाडा, झामी चौक, पोलीस चौकी, राजहंस चौक, पवन चौक, तिरंगा चौक पाचपावली देवी मंदिर, कोंबडी बाजार, विजय शॉपी, पोस्ट ऑफिस, बजरंग सुपर मार्केट, प्रताप मिल येथील श्री संकटमोचन हनुमान मंदिर येथे पोहोचून समारोप होईल.

**गुढीपाडव्यानिमित्त आज मोफत आरोग्य तपासणी शिबिर**

गुढीपाडव्यानिमित्त यामिनी स्वस्त औषधी सेवा जनरिक मेडिसिन स्टोअर्सतर्फे गुरुवार, दि. १९ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत व्हाईट बिल्डिंगजवळ भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे. शिबिरात रक्तदाब, शुगर तसेच वजन (Weighing) यांची मोफत तपासणी होईल. या शिबिराचा जास्तीत जास्त जणांनी लाभ घ्यावा, असे आवाहन यामिनी स्वस्त औषधी सेवा जनरिक मेडिसिन स्टोअर्सतर्फे करण्यात आले आहे. ▲





*अमळनेर : प्रताप महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटनेच्या बोध चिन्हाचे अनावरणप्रसंगी खा. शि. मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, चेअरमन सीए नीरज अग्रवाल, संचालक योगेश मुंदडे, सौ. लीनाताई पाटील, सौ. वसुंधराताई लांडगे, निवृत्त प्राचार्य एस. आर. चौधरी आदी. शेवटच्या छायाचित्रात कार्यक्रमास उपस्थित मान्यवर.*

# माजी विद्यार्थी संघटनेच्या बोध चिन्हाचे प्रताप महाविद्यालयात अनावरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयात मंगळवार, दि. १७ मार्च रोजी माजी विद्यार्थी संघटनेच्या अधिकृत चिन्हाचे अनावरण करण्यात आले. निवृत्त प्राचार्य डॉ. ए. जी. सराफ यांच्या हस्ते बोधचिन्ह अनावरण झाले.

माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्याचे उपस्थितांनी कौतुक केले. भविष्यातील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे माजी विद्यार्थ्यांमधील परस्पर सहकार्य वाढून महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. संघटनेच्या बोध चिन्हामध्ये शिक्षण, एकात्मता व प्रगतीचे प्रतीक म्हणून ग्रंथ, पदवी- टोपी आणि हस्तांदोलन यांचा समावेश आहे. ते माजी विद्यार्थ्यांमधील ऋणानुबंध दृढ करण्याचा संदेश देणारे आहे. खानदेश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, चेअरमन सीए नीरज अग्रवाल, व्हा. चेअरमन जितेंद्र जैन, संचालक योगेश मुंदडे, संचालिका सौ. लीनाताई पाटील, संस्थेचे चिटणीस प्रा. पराग पाटील आदी उपस्थित होते. निवृत्त प्राचार्य डॉ. एस. आर. चौधरी, निवृत्त प्रभारी प्राचार्य डॉ. एम. एस. वाघ, प्रा. डी. डी. पाटील आदी उपस्थित होते. खानदेश शिक्षण मंडळाचे चेअरमन नीरज अग्रवाल यांनी प्रास्ताविक केले. प्रा. नितीन पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव यांनी आभार मानले. ▲

पान १ वर...

# भूमी सुपोषण संवर्धन अभियान शुभारंभाची तयारी पूर्णत्वास

उपविभागीय कृषी अधिकारी सी. डी. साठे, तालुका कृषी अधिकारी सी. जे. ठाकरे, निवृत्त नायब तहसीलदार सी. यू. पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी विजय गांगुर्डे, जळगावचे अन्न सुरक्षा अधिकारी आकाश बोऱ्हाडे, पारोळ्याचे वनक्षेत्रपाल एस. बी. देसले, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता टी. एच. नेमाडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रकाश ताडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. गिरीश गोसावी, अमळनेर पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुभाष राऊत, बी. एम. खरे, पी. व्ही. देसले, किशोर माळी, पी. ए. पाटील, भरतसिंग परदेशी, मंगल सिक्युरिटी एजन्सीचे संचालक राजेंद्र यादव, दिनेश शेलकर, अमळनेर आगारप्रमुख प्रमोद चौधरी, जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन यांचे स्वीय सहाय्यक पितांबर भावसार, कैलास दायमा, नरेंद्र धनराळे, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, खजिनदार गिरीश कुळकर्णी, विश्वस्त अनिल अहिरराव, श्रीमती जयश्रीताई साबे, डी. ए. सोनवणे, आनंद महाले, प्रशासकीय अधिकारी आर. जी. चव्हाण आदी उपस्थित होते. आदी उपस्थित होते.

दरम्यान, अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या पदाधिकाऱ्यांसह विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेतही आढावा बैठक झाली. यामध्ये भूमी सुपोषण संवर्धन या राष्ट्रीय अभियान शुभारंभ सोहळ्याच्या तयारीबाबत सविस्तरपणे चर्चा होऊन उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

अक्षय कृषी परिवाराचे उपाध्यक्ष डॉ. गजानन डांगे म्हणाले, की देशातील शेतजमीन रासायनिक खते व विषारी कीटकनाशकांच्या बेसुमार वापरामुळे अत्यंत विषरहीत झाली आहे. त्यामुळे बळीराजापुढे गेल्या काही वर्षांपासून नापिकीचे गंभीर संकट उभे राहिले आहे. या स्थितीला आळा घालण्यासाठी सन २०२१पासून अक्षय कृषी परिवाराने कृषी व पर्यावरण क्षेत्रांतील विविध सामाजिक आणि धार्मिक संस्था व संघटनांना सोबत घेऊन भूमी सुपोषण व संवर्धन या राष्ट्रीय अभियानाची सुरूवात केली. गेल्या पाच वर्षांपासून हे अभियान देशभरात यशस्वीरित्या राबविले गेले आहे. त्याच अनुषंगाने श्री मंगळग्रह मंदिरात श्री भूमी मातेच्या जन्मदिनी अर्थात चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडव्याच्या मंगल मुहूर्तावर या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ होत आहे. या अभियानात आपल्या सर्वांनी भरीव योगदान देत शेतकऱ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून जागर करावा आणि हे अभियान यशस्वी करावे. या बैठकीत सहसंयोजक आलोकजी गुप्ता, सचिव डॉ. बेरीदम गुणाकरजी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाह बाळासाहेब चौधरी आदींनीही चर्चेत सहभाग नोंदविला. यानंतर जिल्हाधिकारी रोहन घुगे व अक्षय कृषी परिवार तसेच मंगळग्रह सेवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत विविध विभागांच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या मुख्य स्थळासह सुरक्षा व्यवस्था, वाहन पार्किंग व्यवस्था, प्रवेश मार्ग आदींची पाहणी केली. दरम्यान, हा अभियान शुभारंभ सोहळा यशस्वितेसाठी अक्षय कृषी परिवार, मंगळग्रह सेवा संस्था, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, रोटरी क्लब, लायन्स क्लब, निरंकारी परिवार, विविध सामाजिक, धार्मिक संस्था यांचे पदाधिकारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# २०२६ या वर्षाची दिनदर्शिका १९१४ आणि १९४२ ची ‘कॉपी’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इतिहासाची पाने नोंदवितात, की काळाचे चक्र अखेर फिरून पुन्हा त्याच बिंदूवर येते. पण तारखांचीही पुनरावृत्ती होते का? ही बातमी सध्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वेगाने व्हायरल होत आहे आणि यातील एका आश्चर्यकारक साम्यामुळे ज्योतिषींमध्ये तीव्र चर्चा सुरू झाली आहे. गणितीय गणनांनुसार असे दिसून येते, की २०२६ या वर्षाची दिनदर्शिका (कॅलेंडर) ही १९१४ आणि १९४२ या वर्षांच्या दिनदर्शिकांची हुबेहूब ‘कार्बन कॉपी’ आहे. या वर्षांशी संबंधित घटनांचा क्रमही आश्चर्यकारकपणे समान असल्याचे आढळून आल्यावर, हे आश्चर्य आणखीच गडद झाले.

**दिनदर्शिकांचे विलक्षण गणित :** ११२ आणि ८४ वर्षांची चक्रे

गणितीय गणनांनुसार २०२६ ची दिनदर्शिका ही पहिल्या महायुद्धाच्या (१९१४) आणि दुसऱ्या महायुद्धाच्या ऐन भरात असलेल्या (१९४२) वर्षांच्या दिनदर्शिकांशी तंतोतंत जुळते.

**१९१४ विरुद्ध २०२६ :** ११२ वर्षांनंतर, ग्रहांची स्थिती आणि वार (दिवस) अगदी तसेच आहेत.

**१९४२ विरुद्ध २०२६ :** ८४ वर्षांनंतर, तारखा आणि वार अगदी तसेच आहेत.

**१९१४ आणि २०२६ :** आपण तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आहोत का?

वर्ष २०२६ (सद्यःस्थिती)



वर्ष १९१४ (पहिले महायुद्ध)

**तुलनेचे मुद्दे**

- अली खामेनी यांची हत्या
- आर्चड्यूक फ्रान्झ फर्डिनांड हत्या

**ट्रिगर पॉइंट**

- रशिया-युक्रेन युद्धामुळे युरोप दोन गटांमध्ये विभागला गेला.
- जर्मन, रशियन आणि ब्रिटिश साम्राज्यांमध्ये संघर्ष.
- युरोपातील संकट
- क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि ‘सायबर युद्धा’चे एक घातक पर्व.

**पारंपरिक खंदक युद्धपद्धती**

- युद्धाचे स्वरूप
- भारत एक जागतिक महासत्ता म्हणून, राजनैतिक समतोल राखण्यासाठी प्रयत्नशील.
- लाखो भारतीय सैनिकांनी ब्रिटिश सैन्याचा भाग म्हणून सेवा बजावली.

**भारताची भूमिका**

**१९४२ आणि २०२६ :** सत्तेतील बदल आणि जनआंदोलने. १९४२ हे असे वर्ष होते जेव्हा दुसरे महायुद्ध आपल्या सर्वात रक्तरंजित टप्प्यावर होते; तर त्याच वेळी भारतात ‘चले जाव चळवळ’ संपूर्ण देशभर पसरली होती. आज २०२६ मध्ये तीच ऊर्जा पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवत आहे.

जग आज एका ‘स्फोटक वळणावर’ उभे आहे. ज्याप्रमाणे १९१४ आणि १९४२ या वर्षांनी जागतिक सीमांची नव्याने मांडणी केली होती, त्याचप्रमाणे २०२६ चे आगामी महिने हे निश्चित करतील, की जग एखाद्या भव्य आणि सकारात्मक तोडग्याकडे वाटचाल करेल, की पुन्हा एकदा तिसऱ्या महायुद्धाच्या अंधकारात लोटले जाईल. २०२५ चे दिनदर्शिका वर्ष हे १९४१ च्या वर्षाचीच पुनरावृत्ती करणारे ठरले; असे वर्ष ज्यामध्ये आपण ‘पर्ल हार्बर’सारख्या घटनांचे पडसाद अनुभवले. आता २०२६ हे वर्ष आपल्यासमोर उभे आहे एक असे वर्ष, जे १९४२ इतकेच निर्णायक ठरू पाहते आहे.

**भविष्य सुरक्षित आहे का?**

१९४२ मध्ये भारतातील जनता निषेध करण्यासाठी रस्त्यावर उतरली होती. आजभारतात आणि जगभरात ‘जनरेशन झेड’ अर्थात ही नवी पिढी, आपले हक्क आणि बदलाच्या शोधात प्रस्थापित सत्ता-रचनांना आव्हान देत आहे.

**जनउठाव :**

१९४२ मध्ये अनेक प्रमुख नेते तुरुंगात खितपत पडले होते. २०२६ मध्ये अनेक राष्ट्रांमध्ये सत्तापरिवर्तनाची लाट पसरत आहे. विशेषतः व्हेनेझुएलाविरुद्ध अमेरिकेने उचललेली पावले आणि त्यामध्येही प्रामुख्याने मादुरो यांची केलेली धरपकड यामुळे नव्यानेच तणाव निर्माण झाला आहे.

**नेतृत्वाचे संकट :**

१९४२ मध्ये संसाधनांची तीव्र टंचाई होती. आज कच्च्या तेलाच्या किमतींनी १०० डॉलर्सचा टप्पा ओलांडणे, हे जागतिक मंदीच्या संभाव्य धोक्याचे संकेत देत आहे.

**आर्थिक संकट :**

१९४२ मध्ये स्टालिनग्राड आणि मिडवे येथील लढाया निर्णायक ठरल्या होत्या. २०२६ मध्ये, इराण-इस्रायल संघर्ष आणि तांबड्या समुद्रातील तणाव जागतिक व्यापाराचा पाया हादरवून टाकत आहेत.

# गॅस सिलिंडर बुकिंगबाबत महत्त्वपूर्ण माहिती व जनजागृती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आता आपणास व्हॉट्सअॅपद्वारे देखील गॅस सिलिंडर बुकिंग करता येईल. त्यासाठी आपल्या गॅस कंपनीच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधावा.

**इंडेन गॅस ग्राहक**
आपल्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरून 7588888824 या व्हॉट्सअॅप क्रमांकावर REFILL असा संदेश पाठवा.

**एचपी गॅस ग्राहक**
9222201122 या व्हॉट्सअॅप क्रमांकावर Hi किंवा Book असा संदेश पाठवा.

**भारत गॅस ग्राहक**
1800224344 या व्हॉट्सअॅप क्रमांकावर Hi किंवा Book असा संदेश पाठवा.

आपण मिसकॉल देऊनही गॅस सिलिंडर बुक करू शकता. (कॉल नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरूनच करावा).

**इंडेन गॅस** 8454955555 या क्रमांकावर मिसकॉल द्या.

**एचपी गॅस** 9493602222 या क्रमांकावर मिसकॉल द्या.

एसएमएसद्वारे देखील बुकिंग करता येते.

**इंडेन गॅस** 7718955555 या क्रमांकावर रिफील असा SMS पाठवा.

**भारत गॅस** 7715012345 किंवा 7718012345 या क्रमांकावर एलपीजी असा SMS पाठवा.

(टीप : SMS नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरूनच पाठवावा)



सिलिंडर बुक केल्यानंतर वेळेत डिलिव्हरी मिळाली नाही तर तक्रार नोंदवा.

**टोल फ्री क्रमांक :**

**इंडेन गॅस** 1800-2333-555

**भारत गॅस** 1800-22-4344

**एचपी गॅस** 1800-2333-555

अफवांवर विश्वास ठेवू नका. योग्य माहिती घ्या, जागरूक राहा आणि गरज पडल्यास तक्रार करा.

# सर्जनशीलतेचा संस्कार : सई परांजपे



**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी चित्रपटसृष्टी, नाट्यकला आणि साहित्यविश्वात आपली वेगळी छाप उमटवणाऱ्या सई परांजपे यांचा जन्मदिन हा त्यांच्या बहुआयामी प्रतिभेचा गौरव करण्याचा एक सुंदर क्षण आहे. त्यांच्या कार्याचा मागोवा घेताना, त्यांच्या सर्जनशीलतेची उंची आणि समाजाशी असलेले नाते प्रकर्षाने जाणवते.

सई परांजपे यांचा जन्म १९ मार्च १९३८ रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना साहित्य, नाटक आणि कथाकथनाची आवड होती. त्यांच्या आई शकुंतला परांजपे या स्वतः एक लेखिका आणि समाजसेविका होत्या. त्यामुळे सई यांना सर्जनशीलतेचे संस्कार घरातूनच लाभले.

सई परांजपे यांनी त्यांच्या कारकिर्दीत विविध माध्यमांमध्ये काम केले. रेडिओ, दूरदर्शन, रंगभूमी आणि चित्रपट. त्यांची दिग्दर्शकीय शैली साधी, हृदयस्पर्शी आणि वास्तवाशी जोडलेली आहे. त्यांनी मानवी नातेसंबंधांतील सूक्ष्म भावना अत्यंत प्रभावीपणे पडद्यावर आणल्या. त्यांच्या गाजलेल्या चित्रपटांमध्ये स्पर्श, चष्मे बद्दूर आणि कथा यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. ‘स्पर्श’मध्ये त्यांनी दृष्टिहीन व्यक्तींच्या आयुष्याचा संवेदनशील वेध घेतला, तर ‘चष्मे बद्दूर’ हा हलकाफुलका विनोदी चित्रपट आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे. ‘कथा’मध्ये त्यांनी शहरी जीवनातील साध्या माणसांच्या संघर्षाची गोष्ट मांडली.

चित्रपटांसोबतच त्यांनी बालनाट्य आणि दूरदर्शन कार्यक्रमांमध्येही मोठे योगदान दिले. त्यांच्या लेखनात विनोद, कोमलता आणि सामाजिक जाण यांचा सुंदर संगम दिसतो. त्यांनी नेहमीच आशयप्रधान आणि मनाला भिडणारे विषय निवडले, ज्यामुळे त्यांचे काम आजही ताजे वाटते. त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना अनेक सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. त्यात पद्मभूषण सारखा देशातील उच्च सन्मानही समाविष्ट आहे.

सई परांजपे यांचा जन्मदिन हा केवळ एका व्यक्तीचा वाढदिवस नसून, तो सर्जनशीलता, संवेदनशीलता आणि समाजाभिमुख कलेचा उत्सव आहे. त्यांच्या कार्यातून पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळत राहील, यात शंका नाही.

# गहने लौटाने वाली महिला को फिर मिला सम्मान
## घर बुलाकर इस तरह हुई खातिरदारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



चेन्नई में सफाई कर्मचारियों ने ईमानदारी की मिसाल पेश की। सड़क पर मिले गहनों से भरा बैग उन्होंने बिना लालच पुलिस को सौंप दिया। गहनों की कीमत करीब ४५ लाख रुपये बताई गई हैं। इस ईमानदारी से प्रभावित होकर ललिता ज्वेलरी के मालिक ने सफाई कर्मचारियों को अपने घर बुलाकर भोजन कराया और सम्मानित किया।

तमिलनाडु की राजधानी चेन्नई में एक सफाई कर्मचारी ने ईमानदारी की ऐसी मिसाल पेश की है, जिसकी चर्चा अब पूरे देश में हो रही है. सड़क पर मिले लाखों रुपये के सोने के गहनों को बिना किसी लालच के पुलिस के हवाले कर देने वाली महिला सफाई कर्मचारी पद्मा की हर तरफ तारीफ हो रही हैं। इस घटना ने यह साबित कर दिया ईमानदारी आज भी जिंदा हैं ।

इस ईमानदारी से प्रभावित होकर प्रसिद्ध ललिता ज्वेलरी के मालिक ने भी सफाई कर्मचारियों की सराहना की। उन्होंने पद्मा को अपने घर बुलाया, उन्हें भोजन कराया और सम्मानित किया। उन्होंने कहा कि ऐसे लोग समाज के लिए प्रेरणा हैं, जो कठिन परिस्थितियों में भी सही रास्ता नहीं छोडते।

**सड़क पर संदिग्ध बैग**

पुलिस के अनुसार, टी. नगर के मुप्पथमैन टेम्पल स्ट्रीट की रहने वाली पद्मा पॉन्डी बाजार इलाके में अपनी रोज की सफाई ड्यूटी कर रही थीं। इसी दौरान उन्हें सडक किनारे पडा एक बैग दिखाई दिया। बैग संदिग्ध लगने पर जब उन्होंने उसे खोला, तो अंदर बडी मात्रा में सोने के आभूषण देखकर वे हैरान रह गईं ।

